**नियमित फौजदारी खटला क्र.३२०/२०२५**
**सरकार वि. दादासाहेब मुरकुटे व इतर**
**निशाणी क्र.२४**

**साक्षीदार क्र. १ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – बाळासाहेब गोपीनाथ दांगट,

**वय** – ७० वर्षे, व्यवसाय –शेती,

**राहणार** – भेर्डापूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु –**

१. माझ्या कुटुबांत मी, माझी पत्नी व मुलगा असे राहतो. घटना हि दि.२९.१२.२०२३ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० वाजाच्या दरम्यान शिरसगाव येथे घडली. सदर रोजी मी माझी सूनबाई स्नेहल विकास दांगट हिस आणणेकरीता शिरसगाव येथे माझे सूनबाईचे वडील दादासाहेब बाबाराव मुरकुटे यांचेकडे गेलो होतो. मी सदरवेळी माझी सून स्नेहल हिस तिचे पती बरोबर भांडण करू नको व त्यांचे सामान घेवून कारखान्यावर खोली घेतली आहे तेथे दोघे नवरा बायको सुखाने राहा, भांडण करू नका असे समजावून सांगत असताना दादासाहेब मुरकुटे याने लाकडी दांडा घेवून माझ्या डाव्या मांडीवर दोन तिन वार केले. मी सदरचा वार झेलायला गेलो असता तो माझ्या डाव्या हाताच्या दंडावरती लागला. सदरच्या बाबी घडत असताना माझ्या सूनबाईने माझ्या उजव्या हाताच्या दंडाला चावा घेतला. त्यानंतर माझ्या सूनबाईची आई मिना मुरकुटे व भाऊ ध्वजल याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व परत जर शिरसगाव येथे माझ्या बहिणीस, मुलीस घेवून जाण्याकरीता आले तर जिवे मारू अशी धमकी दिली व तिला नांदायचे नाही आम्ही पाठवणार नाही असे सांगितले. आमचा आरडाओरडा चालू असताना आजूबाजूचे लोक आले व त्यांनी वाद थांबवला. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी मला ग्रामीण रुग्णालयामध्ये जाण्याकरीता छोटासा कागद दिला. त्याप्रमाणे मी दवाखान्यात गेलो व उपचार घेतला व मी सदर ठिकाणी दोन दिवस उपचार घेत होतो. त्यानंतर मी पुन्हा पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरीता गेलो व फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखवली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२५** देण्यात आले.

२. त्यानंतर दि.०४.०१.२०२४ रोजी पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदवला. मला

ज्या लाकडी दांडक्याने मारले होते तो दांडका दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला पी.आर.क्र.४९/२०२६ दाखवला. सदरचा लाकडी दांडका तोच आहे. त्यास आर्टीकल अ देण्यात आले. मी ज्या आरोपींनी मला मारहाण केली त्यांना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र.१ व २ न्यायालयात हजर आहेत इतर आरोपी गैरहजर आहेत.(इतर आरोपीतर्फे गैरहजेरीमाफीचा अर्ज निशाणी क्र.२३ अन्वये देण्यात आला).

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. टि. के. चौदंते यांचेमार्फत सुरु –</u>**

३. मी दि.२९.१२.२०२३ रोजी ग्रामीण रुग्णालय शिरसगाव येथे गेलो होतो. मला सदर ठिकाणी ॲडमीट केले नव्हते. मी सदर रोजी दुपारी ३.०० ते ३.३० वाजाच्य सुमारास ग्रामीण रुग्णालय येथे गेलो होतो. माझ्यासोबत कोणी आले नव्हते मी एकटा गेलो होतो. मी मोटरसायकलवरती रुग्णालयात गेलो होतो. उपचार घेतल्यानंतर मी मोटरसायकलवर घरी गेलो. माझी मोटरसायकल ही गेअरची होती.

४. मला तिन मुले आहेत. दि.२९.१२.२०२३ रोजी माझे व माझे मुले प्रफुल्ल व विकास यांचे भांडण झाले नव्हते आमचे बोलणे चालू होते. हे मला सांगता येणार नाही की, दि.२९.१२.२०२३ रोजी प्रफुल्ल व विकास यांचेकडे मोबाईल फोन होता किंवा नाही. सदर वेळी माझ्याकडे मोबाईल फोन होता. शिरसगाव येथे माझे एकही नातेवाईक नाही. दि.०४.०१.२०२४ व दि.०५.०१.२०२४ रोजी मी शिरसगाव येथे गेलो नव्हतो. आरोपी क्र.१ हे माझ्या पत्नीचे भाऊ देखील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि.२९, ३०, ३१ डिसेंबर २०२३ व दि.०१ व ०२ जानेवारी २०२४ रोजी मी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुद्ध लेखी तक्रार दिली नाही.

५. माझा मुलगा विकास याचा विवाह २०१० साली झाला. हे म्हणणे खरे आहे की, विकास यास दारुचे व्यसन आहे. साक्षीदार सांगतो की आता आहे. विकास हा अशोक कारखाना येथे काम करत होता. मी आरोपी क्र.१ यांच्या घरी माझ्या सूनेला आणण्याकरीता गेलो होतो त्यावेळी त्यांच्या घराच्या ओट्यावर बसलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ यांच्या घराच्या पश्चिमेस रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या घराच्या परिसरात आजूबाजूला ब–याच लोकांची घरे आहेत. मी आरोपीच्या घरी मोटरसायकलवरती गेलो होतो. प्रफुल व विकास माझ्यासोबत आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, विकास हा सदर रोजी सदर ठिकाणी दारु

पिवून आला होता. हे मला सांगता येणार नाही की, दि.३०.१२.२०२३ रोजी आरोपी क्र.१ दादासाहेब मुरकुटे हे साखर कामगार हॉस्पीटल येथे भरती होते किंवा कसे. मी भेर्डापूर येथे ज्या ठिकाणी राहतो ती जागा माझी स्वतःची नाही. सदर ठिकाणी माझे सिमेंटचे स्लॅबचे घर आहे. सदरचे घर मीच बांधले आहे. मी कारखान्यावर खोली घेतल्याचे माझ्या सरतपासात सांगत आहे ती खोली माझा मुलगा विकास याने घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर कारखान्यावरील खोलीच्या परिसरामध्ये कारखान्याचे कामगार राहतात. भेर्डापूर येथील माझे घर शेतामध्ये आहे. सदर शेतजमीनीचा अंदाजे गट नं.१८२ असावा. हे म्हणणे खरे नाही की, माझे वर नमूद घर हे माझ्या वडिलोपार्जित शेतजमीनीमध्ये आहे. सदरची जमीन ही मी विकत घेतलेली नाही ती माझ्या भावाची आहे. सदरच्या घरामध्ये आजरोजी मी, माझी पत्नी व प्रफुल्ल, त्याचे कुटुंब असे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या घरामध्ये मी माझ्या सूनेस राहू देत नव्हतो.

६. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझ्या सरतपासातील मजकूर की, आरोपीने माझ्या सूनेस नांदावयाचे नाही तिला पाठवणार नाही असे म्हटल्याचे मी पोलीसांना सांगितले होते. तसेच मी फिर्याद देतेवेळी आरोपींनी डाव्या मांडीवर 'दोन ते तिन' वार केल्याचे सांगितले होते. आता मला माझा पोलीसांसमोरील जबाब दाखवला. सदरच्या बाबी माझ्या जबाबाबत नमूद नाहीत त्या का नमूद नाहीत याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी कारखान्यावर खोली घेतल्याचे माझ्या सूनेस सांगितल्याचे सांगितले नव्हते.

७. आता मला अभिलेखावरील जप्ती पंचनाम्यासोबतचा माझा फोटो दाखवला. सदरचा फोटो हा शिरसगाव येथील आहे. सी.ई.० ४७२ हा माझ्या मोटरसायकलचा क्रमांक नाही. हे मला सांगता येणार नाही की, सदरचा फोटो हा पोलीस स्टेशनमधला आहे किंवा कसे. सदरचा फोटो यास **निशाणी क्र.२६** देण्यात आले.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सूनेला नांदायला चल म्हणून घ्यायला गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझ्या सूनेने विकास हा दारु पितो असे म्हणाली व त्यामुळे ती नांदायला येणार नाही असे म्हणून नांदायला येण्यास नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, विकास तिला मारहाण देखील करतो असे देखील माझ्या सूनेने मला म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझ्या सूनेस बळजबरीने हातास धरुन गाडीवर बसवण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सूनेस नांदायला चल म्हणत होतो व ती नकार देत होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपी क्र.१ हे सदर ठिकाणी आले व ते तिला नांदायला

जाण्याची इच्छा नाही असे म्हणाले. हे मला सांगता येणार नाही की, सदर वेळी महानंद करडक, अनिल बडे व कुणाल बोराडे हे सदर ठिकाणी आले होते किंवा कसे. सदर ठिकाणी अनेक लोक आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वेळी मी आरोपी क्र.१ यांचे डावे हाताच्या दंडाला चावा घेतला व प्रफुल्ल याने लाथाबुक्क्याने व काठीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर विकास याने आरोपीस वाईट वाईट शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे आहे की, दि.३०.१२.२०२३ रोजी माझे, विकास व प्रफुल्ल यांचेविरुद्ध दादासाहेब मुरकुटे यांनी मारहाण केलेबाबत फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की,सदर फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलीसांनी मला सांगितले की, माझे व माझ्या दोन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी देखील दि.०३.०१.२०२४ रोजी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

९. मी शेती काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, शेती कामादरम्यान लहाण–सहान दुखापती होत असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडीवरुन पडल्यामुळे व शेतीमध्ये काम करताना किरकोळ जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासातील मजकूर आरोपीने मला लाकडी दंडाने मारल्याचे, डाव्या दंडाला चावा घेतल्याचे, शिवीगाळ केल्याचे व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती...

sd/–

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक – ०२/०६/२०२६. न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.